**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**बारामती परिमंडळ, बारामती यांचे समोर**

---

ग्राहक तक्रार क्र.03/2014
दिनांक : 26/02/2013

मेसर्स श्री. प्रदीप ॲग्रोटेक प्रा.लि., — अर्जदार
गॅट नं.1883/1/डी/2 ,कडलस
ता. हवेली, जि. पुणे

**<u>विरुध्द</u>**

अधिक्षक अभियंता, — विरुध्द पक्षकार
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
सोलापूर मंडल कार्यालय

कोरम : 1. श्री. शरद मडके,अध्यक्ष
2. श्री. व्ही.एम.भट्टड,सदस्य सचिव
3. श्री. सूर्यकांत पाठक,सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच) विनियम 2006 मधील 8.2 चे तरतुदींनुसार –

1. मे. प्रदिप ॲग्रोटेक यांचे ग्राहक प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे यांनी महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विधीनियम 2006 चे कलम 6.10 नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीविरुध्द तक्रार 11.11.2013 रोजी दाखल केली आहे.
2. वादी यांनी आपले गाऱ्हाणे थोडक्यात पुढीलप्रमाणे सादर केले आहे.
   अ) मे. प्रदिप ॲग्रोटेक, कडलस, ता.सांगोला, जि.सोलापूर हे वितरण कंपनीचे ग्राहक असून ग्राहक क्रं.340040592003 असून 95 अश्वशक्ती लघुदाब ग्राहकास 22 मार्च 2009 रोजी वीजपुरवठा केलेला आहे. वादी यांनी वीज पुरवठयासाठी लागणारी सर्व वाहिनी स्वखर्चाने उभी केली आहे.
   ब) वादी यांनी अंदाजपत्रकाची रक्कम रु.2,69,110/– (रु.दोन लक्ष एकोणसत्तर हजार एकशे दहा फक्त) डी.टी.सी. मिटरची किंमत रु. 22360/–(रु.बावीस हजार तिनशे साठ फक्त) ट्रान्सफॉर्मर टेस्टींग फी रु. 3000/–(रु. तीन हजार फक्त) व कपॅसिटर टेस्टींग फी रु.100 (रु. शंभर फक्त) भरली आहे. वादी हे 95 अश्वशक्ती लघुदाब ग्राहक आहेत.

क) वादी यांनी मटेरियलचा खर्च बिलातून व्याजासह परत करावा व वरील काम नॉन डी.डी.एफ. योजनेअंतर्गत आहे असे संबोधावे अशी विनंती केली आहे.

ड) वादीच्या मते वितरण कंपनीने दिलेल्या डी.डी.एफ. मंजुरीनुसार दिलेले एस्टीमेट व 1.3% सुपरव्हीजन चार्जेस हे वीज कायदयातील तरतुदी व राज्य वीज नियामक आयोगाच्या तरतुदींच्या विरुध्द आहे.

इ) वादी यांना डी.डी.एफ. सुविधा दिलेली नसल्यामुळे वादी यांनी केलेला सर्व खर्च सव्याज परत करावा अशी मागणी केली आहे.

3. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी आपले लेखी म्हणणे दि.25.11.2013 रोजी दाखल करुन वादी यांची मागणी अमान्य केली आहे. वीज वितरण कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांना कराराप्रमाणे संमतीनुसार डी.डी.एफ. योजनेअंतर्गत 28 सप्टेंबर 2007 च्या पत्रानुसार मंजूर केला आहे.

4. वीज वितरण कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर तयार करुन त्याच्या स्वतःच्या जागेत घेतलेला आहे. बाहेरील कोणतेही वीज कनेक्शन जोडलेले नसून ट्रान्सफॉर्मर, वादी यांच्या मालकीच्या जागेत असल्याने भविष्यात इतरांना वीज पुरवठा करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

5. ग्राहकाच्या विनंतीनुसार इन्फ्रास्ट्रक्चर डेडीकेटेड रहावे म्हणून स्वतः संमतीने खर्च करुन उभे केले असून गेल्या 5 वर्षात कसलीही तक्रार केली नाही. सदर घडलेला कालावधी हा 2 वर्षापेक्षा जास्त असल्याने त्याचा निवाडा या मंचाच्या कक्षेत येत नाही.

6. वादी यांचा ट्रान्सफॉर्मर त्यांच्या पुरताच मर्यादित ठेवल्याने तो महावितरण कंपनीच्या नेटवर्कचा भाग राहिलेला नाही व त्यावर इतर ग्राहक व लाईन न जोडल्याने इतरांसाठी शटडाऊन किंवा लाईन बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादी यांनी त्वरीत प्राधान्याने वीज पुरवठा उद्योगधंदयासाठी आवश्यक असल्याने स्वतः सर्व खर्च संमतीने केला आहे.

7. वादी यांनी परिपत्रक क्रं. 22197 दि. 20.5.2008 चा आधार घेतलेला आहे. तथापी ग्राहकाचे कनेक्शन 28 सप्टेंबर 2007 रोजी मंजूर झाल्याने या प्रकरणी लागू होत नाही. मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांचा केस क्रं. 56/2007 दि. 16.2.2008 चा निर्णय याबाबत बंधनकारक नाही.

8. दोन्ही बाजूंच्या म्हणण्यानुसार खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

(1) वादी हे त्यांनी केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीचा खर्च प्रतिवादी कडून मिळण्यास पात्र आहेत काय?

(2) वादी हे मीटरचा खर्च प्रतिवादी म.रा.वि.वि.कं.कडून मिळण्यास पात्र आहेत काय?

(3) वादी हे इतर अन्य उपाययोजनेसाठी पात्र आहेत काय?

(4) आदेश

9. मंचाच्या मते वरील प्रश्नांचा खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

(1) नाही.

(2) होय.

(3) नाही.

(4) आदेश खालीलप्रमाणे

## कारणमिमांसा

10. श्री. हरिभाऊ खापरे यांनी वादीच्या वतीने दाखल केलेल्या अर्जासोबत कागदपत्रे दाखल केली आहेत. प्रामुख्याने वादी व प्रतिवादी यांच्यामधील विद्युत पुरवठयासंबंधी सर्व पत्रव्यवहार दाखल आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन वादीला वीजपुरवठयासाठी एस्टीमेट 28 सप्टेंबर 2007 रोजी अधीक्षक अभियंता यांनी दिले. वादी यांनी रु.1,21,030/- (रु.एक लाख एकवीस हजार तीस फक्त) 18 जानेवारी 2008 रोजी भरले. ट्रान्सफॉर्मर टेस्टींग फी व इतर फी दि. 5.2.2009 रोजी भरले व विद्युत पुरवठा 22 मार्च 2009 रोजी सुरु झाला.
11. श्री. हरिभाऊ खापरे यांनी महाराष्ट्र वीज नियामक आयोग केस नं. 56/2007 मध्ये आयोगांनी दि. 16.2.2008 रोजी दिलेल्या निर्णयाचा उल्लेख केला. त्यांनी असे नमूद केले की वरील निर्णयानंतर प्रतिवादी कंपनीचे 20 मे 2008 रोजी परिपत्रक क्रं. 22197 प्रसिध्द केले. वरील दोन्ही महत्वपूर्ण निर्णयानुसार इन्फ्रास्ट्रक्चरचा खर्च वादी मिळण्यास पात्र आहेत असा युक्तीवाद केला.
12. कार्यकारी अभियंता (मराविविकं) यांनी नमूद केले की, अर्जदाराने वीज पुरवठयाच्या अटीमध्ये डी.डी.एफ. योजनेचा उल्लेख करुन, वादीस दिलेली वाहिनी व ट्रान्सफॉर्मर त्यांच्यापुरतेच डेडीकेटेड असावे अशी अट आहे. वादीचे कनेक्शन सर्व्हीस कनेक्शन नसून त्यांच्याकरिता त्यांनी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर तयार करुन त्यांच्या स्वतःच्या जागेत घेतला आहे. सदर ठिकाणी बाहेरील कोणतेही वीज कनेक्शन जोडलेले नाही व भविष्यात तसे करण्याचा प्रश्न येत नाही. वादीचा ट्रान्सफॉर्मर त्यांच्या पुरताच मर्यादित ठेवल्याने तो महावितरण कंपनीचा कॉमन नेटवर्कचा भाग राहिलेला नाही व त्यावर इतर ग्राहक जोडले नसल्याने इतरासाठी लाईट बंद राहण्याचा प्रश्न येत नाही.
13. कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले की विद्युत पुरवठा दिल्यापासून ऑगस्ट-2013 पर्यत वादींनी स्वखुशीने सर्व वीज देयके भरलेली आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राऱ्हाणी निवारण मंच) अधिनियम-2006 च्या कलम 6.6 नुसार तक्रार मुदतीमध्ये दाखल केली नसल्याने मंचासमोर चालणार नाही असे सांगितले.
14. कार्यकारी अभियंता यांनी आपल्या युक्तीवादामध्ये असे स्पष्ट केले की सदर केस दि. 28.9.2007 मधील असल्याने, विद्युत नियामक आयोग यांनी दि.16.2.2008 रोजी दिलेला निर्णय व विद्युत वितरण कंपनीचे परिपत्रक दि.20.5.2008 या प्रकरणी लागू होणार नाही.
15. वादी यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचेकडे तक्रार दाखल केली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद एकून वादीचा अर्ज नामंजूर केला व वीज वितरण कंपनी ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम 2005 च्या कलम 3 नुसार सदर खर्च ग्राहकाकडून घेऊ शकते असा निर्णय दिला.
16. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून व दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या अभ्यासावरुन खालील गोष्टी दोन्ही बाजूंनी मान्य केल्या आहेत. वादींचा पुरवठयासाठीचा अर्ज 2007 मध्ये मंजूर झाला व विद्युत पुरवठा 2009 मध्ये

देण्यात आला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा दि. 16.2.2008 चा निर्णय व परिपत्रक दि. 20.5.2008 हे दरम्यानच्या म्हणजेच 2007 ते 2009 च्या कालावधीतील आहेत.

17. प्रस्तुत प्रकरणी महत्वाचा विषय हा आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामधील करार–2007 मध्ये झाला आहे. वादींनी प्राधन्याने वीज पुरवठा मिळण्यासाठी अर्ज दिला व दोन्ही बाजूंनी अटी मान्य केल्या व करार अंमलात आला. दोन्ही बाजुंनी करारातील अटींची पूर्तता ही सप्टेंबर–2007 व जानेवारी 2008 मध्ये पैसे भरुन केली आहे. दि.28.9.2007 च्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, वादी यांनी स्वतः वस्तू आणून इन्फ्रास्ट्रक्चरचे (पायाभुत सुविधा) काम करावयाचे आहे व डी.टी.सी. मिटर कंपनीने देण्याचा आहे. कराराप्रमाणे वादी यांनी पूर्तता करावयाची आहे. करारातील अटींची पूर्तता बहुतांश अगोदरच झाली आहे. करार मुक्त संमतीने झाला असल्याचे दिसून येते. म.रा.वि.वि. कं.मर्या., ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम 2005 नुसार कलम 3.3 नुसार वसुली करते. सदर करार हा विद्युत आयोगाच्या विनियम 2005 मधील तरतुदींनुसार केला आहे.

18. मंचाच्या मते दोन्ही बाजूंच्या करारानंतर दिलेले निर्णय यांची अंमलबजावणी निर्णयाच्या तारखेपासून असते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. 16.2.2008 निर्णयाचा व परिपत्रक 22197 दि. 20.5.2008 चा फायदा हा या निर्णयाच्या नंतरच्या व्यक्तींना मिळणार आहे. म्हणून वादी हे सदर इन्फ्रास्ट्रक्चरचा खर्च मिळण्यास कायदयाने पात्र नाहीत.

19. श्री. हरिभाऊ खापरे यांनी मा. इलेक्ट्रीसिटी ओम्बडस्मन, मुंबई यांची रिट केस नं. 36/2012 श्री. चंद्रशेखर रेवप्पा गोबी विरुध्द म.रा.वि.वि.कं. या केसमधील निर्णयाचा संदर्भ दिला आहे. श्री. खापरे यांनी असे सांगितले की, मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. 1.9.2010 च्या आदेशान्वये वीज वितरण कंपनीने 9 सप्टेंबर 2006 ते 20 मे 2008 दरम्यानच्या सर्व कनेक्शनची तपासणी करुन जर नियमापेक्षा जास्त पैसे घेतले असतील तर ते परत मिळण्यासाठी ग्राहकांनी म.रा.वि.वि.कं.कडे अर्ज करावेत. वादी यांनी दि. 23.9.2010 रोजी अर्ज केला असून सदर खर्च बिलातून वजा होण्यासाठी विनंती केली आहे.

20. श्री. हरिभाऊ खापरे यांचे व कार्यकारी अभियंता यांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादीचा करार हा सप्टेंबर–2007 चा आहे व तो करार डी.डी.एफ. फॅसिलिटीच्या संदर्भात आहे. करारामध्ये तसा उल्लेख आहे. सप्टेंबर–2007 मध्ये डी.डी.एफ.ची सुविधा दिली असल्याने मा. वीज नियामक आयोगाची दि. 16.8.2008 ची डी.डी.एफ.ची व्याख्या पूर्वीच्या करारांना लागू होणार नाही. श्री. खापरे यांनी कोणताही तसा पुरावा दिलेला नाही की वीज वितरण कंपनीने जास्त वसूली केली आहे. त्यामुळे वादी यांना रक्कम मागता येणार नाही.

21. वादी यांनी दि. 23.9.2010 रोजी रक्कम मागण्यासाठी कंपनीकडे अर्ज दिला. जर प्रतिवादींनी वादीचा विनंती अर्ज मंजूर केला नसेल तर कायद्यातील तरतुदीप्रमाणे वादी यांना या ग्राहक मंचात दोन वर्षात तक्रार दाखल करणे

आवश्यक होते. मा. वीज नियामक आयोगाच्या दि.1.9.2010 च्या आदेशामध्ये म्हटले आहे की, वादीचा अर्ज वितरण कंपनीने मंजूर केला नाही तर ग्राहक मंचाकडे तक्रार करावी. तथापी वादी यांनी मुदतीमध्ये तक्रार अर्ज केला नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तक्रार निवारण मंच) रेग्युलेशन 2006 चे कलम 6.6 नुसार 2 वर्षानंतर आलेल्या तक्रारीबद्दल ग्राहक मंचास दखल घेण्याचा अधिकार नाही. श्री. हरिभाऊ खापरे यांनी तक्रार दाखल करण्यास झालेल्या विलंबास माफी किंवा सवलत मिळण्यासाठी विनंती अर्ज केला नाही म्हणून ही तक्रार मुदतीच्या बाहेर असल्याने चालू शकत नाही.

22. वादी यांनी मागणी केलेली रक्कम गुणवत्तेच्या व मुदतीच्या कारणावरुन नामंजूर केली आहे. तथापी प्रतिवादी यांनी डी.टी.सी. मिटर पुरविणे ही कायदेशीर जिम्मेदारी आहे व त्यास मुदतीचा प्रश्न येत नाही. कारण ते पैसे देणे हे प्रतिवादीची सदैव कर्तव्य आहे त्यास continuous cause of action असल्याने मुदतीचा प्रश्न येत नाही. दि. 28 सप्टेंबर 2007 च्या मंजूर पत्रामध्ये स्पष्ट म्हटले आहे की फक्त डी.टी.सी. मिटर वीज कंपनीने पुरवणे आवश्यक आहे. वादी यांनी त्यासाठी रु. 22360/– भरले असून सदर रक्कमेवर विद्युत कायदा 2003 चे कलम 62(6) प्रमाणे बॅंकेच्या रेटप्रमाणे व्याज मिळणेस पात्र आहे.

23. मंचाच्या मते जर प्रतिवादी यांनी वादी यांचा अर्ज मिळाला किंवा नाही याबद्दल काहीही म्हटले नाही. जर तसा अर्ज वादींनी केला तर प्रतिवादी त्यावर नियमाप्रमाणे निर्णय घेऊ शकतात. वादी यांनी विद्युत पुरवठा मिळण्यास विलंब झाल्याबद्दल कोणतेही नुकसानभरपाई मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कृतीची मानके प्रमाणे मागितला नसल्याने त्याबद्दल निर्णय घेतला नाही.

24. वरील सर्व विनिमयावरुन न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.
    1. तक्रार अर्ज अंशःत मंजूर करण्यात येत आहे.
    2. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वादी यांना डी.टी.सी. मिटरची किंमत रु. 22360/– राष्ट्रीयकृत बॅंकेच्या नियमाप्रमाणे व्याजासहीत बिलाद्वारे दि. 18.1.2008 पासून देण्यात यावी.
    3. सदर आदेशाची अंमलबजावणी एक महिन्यात करुन मंचास कळवावे.
    4. तक्रारदार यांना अपील करावयाचे असेल तर 60 दिवसांत मा. विद्युत लोकपाल, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई –51 यांजकडे करावे.

श्री.शरद मडके,
अध्यक्ष

श्री.व्ही.एम.भट्टड,
सदस्य/सचिव

श्री.सूर्यकांत पाठक,
सदस्य